गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५


## क्रीडा, सांस्कृतिक स्पर्धे शिवानी आश्रमशाळेचे सुयश

**गडचिरोली :** समाजकल्याण आयुक्त कार्यालयामार्फत २ ते ५ जानेवारी या कालावधीत समाजकल्याण वसतिगृह नवेगाव येथील पटांगणावर घेण्यात आलेल्या क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेत गोविंदपूर येथील शिवानी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

शिवानी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी आयोजित कबड्डी, खो-खो, कॅरम, रिले, गोळाफेक, १०० मीटर, २०० मीटर धावणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमात चमकदार कामगिरी करत १३ पदके पटकावून नावलौकिक केले आहे. या क्रीडा स्पर्धेत शिवानी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी कबड्डी स्पर्धेत माध्यमिक गटातील मुलांचा संघाने प्रथम पारितोषिक, तर खो-खोमध्ये प्राथमिक मुलींच्या संघाने प्रथम, सांस्कृतिक कार्यक्रमात मुले, मुलींनी प्रथम, कॅरम स्पर्धेत मुलांचा संघाने प्रथम क्रमांक मिळविला. विद्यार्थ्यांनी घवघवी यश संपादन केल्याबद्दल आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका संगीता देशमुख यांनी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

# रेल्वे क्रॉसिंग फ्लायओव्हरची घोषणा हवेतच!

## तब्बल आठ वर्षाचा कालावधी लोटूनही वाहतुकीची समस्या कायम

**विशेष प्रतिनिधी**

**देसाईगंज दि. ९ :** ज्या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गाला रेल्वे क्रासिंग असते त्या ठिकाणी शासन नियमानुसार फ्लायओव्हरची तरतूद असतेच. असे असताना तब्बल आठ वर्षाचा कालावधी लोटूनही देसाईगंज रेल्वे क्रासिंग फ्लायओव्हर तयारच करण्यात न आल्याने करण्यात आलेली घोषणा हवेतच विरु लागली आहे. यामुळे वाहतुकीची समस्या कायम असल्याने शासनाच्या एकुणच कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह लावल्या जाऊ लागले आहेत.

साकोली-वडसा-गडचिरोली-चामोर्शी-आष्टी-आलापल्ली-रेपनपल्ली-सिरोंचा या नवघोषीत राष्ट्रीय महामार्गाचे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते ११ मार्च २०१६ ला गाज्यावाज्यात शुभारंभ करण्यात आले होते. या महत्वाकांक्षी योजनेत वडसा रेल्वे क्रासिंगचा देखील प्रामुख्याने समावेश होता. या घोषणेला तब्बल आठ वर्षाचा कालावधी लोटून देखील गडचिरोली जिल्ह्यात एकमेव रेल्वे स्टेशन असलेल्या वडसा रेल्वे क्रासिंग राष्ट्रीय महामार्गावर फ्लायओव्हरची नागरीक मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत.



देसाईगंज शहर रेल्वे क्रासिंगमुळे दोन भागात विभागले गेले असुन एका भागात रहिवासी तर दुसऱ्या भागात मुख्य बाजारपेठ व महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत.शहराच्या मधोमध दक्षिण-पुर्व मध्य रेल्वे लाईन गेल्यामुळे दिवसातून दहा ते बारा वेळा रेल्वे फाटक पडत असल्याने नागरिकांना रेल्वे फाटकावर तासनतास ताटकळत उभे राहावे लागत होते. त्यामुळे भूमिगत रेल्वे पुलाचा ॲप्रोच रस्ता तयार करण्यात आला असुन पुलाची उंची ३.६० मीटर अधि. कतम असल्याने यातुन केवळ मोटारसायकल, ट्रक्टर, टॅक्सी, कार अशी हलकी वाहने मार्गक्रमण करू शकतात.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ मार्च २०१६ रोजी सेतु-भारतम् योजनेची सुरुवात करुन या माध्यमातून देशातल्या सर्व राष्ट्रीय महामार्गांना पुढील चार वर्षात रेल्वे क्रासिंग मुक्त करण्याचे घोषीत केले होते. याबाबत संपुर्ण देशात एकुण २०८ रेल्वे क्रासिंगची निवड करण्यात आली होती, ज्यात रेल्वे क्रासिंग व पुल बनविण्यात येणार होते. यात महाराष्ट्र राज्यातील १२ मार्गांवरील फ्लायओव्हर्सचा देखील समावेश असुन यात वडसा रेल्वे क्रासिंगचा देखील समावेश होता. फ्लायओव्हरमुळे रेल्वे क्रासिंग फाटक मुक्त झाल्याने वाहतूकीचा कायम प्रश्न मार्गी लागणार होता. मात्र घोषणेची अंमलबजावणीच करण्यात आली नसल्याने वाहतुकीची समस्या अद्यापही कायमच असुन यामुळे वाहतुकदारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही गंभीर समस्या लक्षात घेता केलेल्या घोषणेनुसार याठिकाणी फ्लायओव्हर बांधण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## दारू तस्करांची नवीन शक्कल; भंगार साहित्याआड वाहनातून दारू तस्करी

### ३.२० लाखांचा मुद्देमाल जप्तः चामोर्शी पोलिसांची कारवाई



**तालुका प्रतिनिधी**

**चामोर्शी दि. ९ :** चंद्रपूर जिल्ह्यातून छोटा हत्ती चारचाकी पिकअप वाहनात भंगार साहित्याची शक्कल लढवून त्या साहित्या खाली अवैधरित्या देशी दारू वाहतूक करून तालुक्यातील फोकूर्डी ते नवेगाव दरम्यान वाहतूक करत असताना चामा. शीं पोलिसांनी त्यांचा डाव उधळून लावत ३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केली. सदर कारवाई ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६ ते ७ वाजताच्या सुमारास करण्यात आली. मात्र, यातील पाचही आरोपी फरार होण्यास यशस्वी झाले.

प्राप्त माहितीनुसार ६ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास तालुक्यातील फराडा येथील उत्तम देशमुख व सावली येथील सागर शेंडे यांनी चंद्रपूर जिल्ह्यातून पीकअप चारचाकी वाहनाने अवैधरित्या दारू वाहतूक करून फोकुर्डी येथील वी. भा. गोहने यांना फोकुर्डी ते नवेगाव रोडवर पुरवठा करून तो ट्रॅक्टर ने नेणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. चामोर्शी पोलिस पथक फोकुडी गावात वाहन सोडून पायी चालत जात असताना नवेगाव जवळ पीकअप वाहनातून ट्रॅक्टरमध्ये तीन इसम काहीतरी चुंगड्या भरत असल्याचे दिसल्याने आढळून आले. सदर इसमांना पोलिस आल्याची चाहूल लागताच चालक ट्रॅक्टर घेऊन घटनास्थळावरून पळून गेला. दरम्यान चारचाकी वाहनाचा चालकही पळ काढला. पोलिसांनी एमएच - ३४-बीझ -००६५ च्या वाहनाची तपासणी केली असता त्यांनी भंगार साहित्यात लपवून ठेवलेले मागील डाल्यात १५ बॉक्स देशी दारू आढळून आली. दारूची किंमती १ लाख २० वीस हजार व २ लाख रूपये किंमतीचे पिकअप वाहन असा एकूण ३ लाख २० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केली. याप्रकरणी आरोपी विरुध्द चामोर्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक अमुल कातबाने यांच्या मार्गदर्शनात पोउनि राधा शिंदे व पोशी एकनाथ वनवे करीत आहेत.

## अधिकाधिक महिलांना सदस्य बनून भाजपाची शक्ती वाढवावीः माजी आ. डॉ. होळी



**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ९ :** भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वातील केंद्र व राज्य सरकारने नेहमीच महिलांना सक्षम करण्यासाठी अनेक पावले उचलली. महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवित आहेत. भाजपा मातृशक्तीच्या विकासासाठी नेहमीच कटीबद्ध राहिलेली आहे, त्यामुळे अधिकाधिक महिलांनी भाजपाचे सदस्य होऊन भारतीय जनता पार्टीची शक्ती वाढवावी, असे आवाहन गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार तथा भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. देवराव होळी यांनी केले.

गडचिरोली येथे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या वतीने भाजपा सदस्य अभियाना संदर्भातील बैठकीला उपस्थित महिला पदाधिक. ाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. बैठकीला भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश, जिल्हा, तालुका व शहर स्तरावरील महिला पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होत्या.

## गडचिरोली शहरातून वीस हजारांचा नायलॉन मांजा जप्त

### शहर पोलिसांची कारवाईः एकावर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ९ :** नायलॉन मांजा हा जीवघेणा आहे. यापूर्वीही कित्येकांचे जीवन या मांजाने घेतले आहे. नियमानुसार याच्या खरेदी-विक्रीवर निर्बंध आहेत. तरीही शहरात खरेदी-विक्री होताना दिसून येत आहे. ही बाब लक्षात घेत शहर पोलिसांनी नायलॉन मांजाविरोधात धडक मोहिम राबविण्यास सुरुवात केली आहे. याअंतर्गत डीबी पथकाने गुरुवारी, (दि.९)शहरातील हनुमान वार्डात धडक कारवाई करीत २० हजार रुपये किंमतीचा नायॅलॉन मांजा जप्त केला. याप्रकरणी लियॉन ॲंड कंपनीचे संचालक नवनाथ नानाजी भांडेकर (३६) याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मकरसंक्राती सण काही दिवसां. वर येऊ ठेपला आहे. अशातच शहरातील विविध वार्डात पतंगासह मांजाची दुकाने सजली आहेत. बच्चेकंपनीसह युवा पंतग उडविण्यात धुंद झाली आहेत. अशावेळी नायलॉन मांजामुळे होणाऱ्या घटना, अपघात लक्षात घेता शासनाने नायलह्न मांजावर प्रतिबंध घातला असून विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. याअंतर्गत पो. लिस अधीक्षक नीलोत्पल यांनी जिल्हाभरातील सर्व पोलिस ठाणे, उप पोलिस ठाणे, पोलिस मदत केंद्रांना नायलॉन मांजा विरोधात कडक धोरण अवलंबविण्याचे निर्देश दिले आहे.



याअंतर्गत शहर पोलिसांनी धडक मो. हिम राबविली आहे.

शहरातील हनुमान वार्डातील एका दुकानात प्रतिबंधित नायलह्न मांजा विक्री होत असल्याची गुप्त मा. हती पोलिसांना प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे शहर पोलिस ठाण्यातील डीबी पथकाने दुकानावर धाड टाकीत २० हजार रुपये किंमती. चे नायलॉन मांजाचे ४० बंडल जप्त केले. याप्रकरणी नवनाथ नानाजी भांडेकर रा. हनुमान वार्ड याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई ठाणेदार रेवचंद सिंगनजुडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे कुडावळे, चौधरी, भैसारे, मेश्राम, महिला पोलीस कर्मचारी म्हशाखेत्री, खोब्रागडे आदींनी पार पाडली.

महाराष्ट्र शासन

**जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,गडचिरोली**

**मेडीकल कॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५**

**ई-लिलाव सुचना**

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,गडचिरोली अंतर्गत उप जिल्हा रुग्णालय, कुरखेडा, ग्रामिण रुग्णालय, धानोरा येथील निर्लेखित उपकरणे व जडवस्तु साहित्यांची - लिलाव पध्दतीने विक्री करणेकरीता इच्छुक लिलावदारोचे सहभागाकरीता सदर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

इच्छुक ई-लिलाव दारांना दिनांक - १३/०१/२०२५ (वेळ-१२.००) ते दिनांक - २३/०१/२०२५ (वेळ-१७.००) आवश्यक बाबींची ऑनलाईन पध्दतीने पूर्तताकरता येईल व ई-लिलाव सुचनेबाबतचा सविस्तर तपशील www.eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

क्र. संमावज/नाग/६५५/२०२५

जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय,गडचिरोली

## पत्रकार मुकेश चंद्रकार यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

### जिल्हाधिकारी यांना निवेदनः गडचिरोली जिल्हयातील पत्रकारांचा मोर्चा

**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ९ :** एनडीटीव्ही व बस्तर जॅक्शनचे पत्रकार मुकेश चंद्रकार छत्तीसगड यांची निघृण हत्या करण्यात आली. या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून त्यांच्या मारेकरांना फाशिची शिक्षा देण्यात यावी. तसेच गडचिरोली जिल्हयात रेती, मुरूम माफीया, दारू विक्रेते यांचे अवैध धंदे बंद करावे. जिल्ह्यातील पत्रकार हे वृत्तांकन करण्यासाठी नक्षलग्रस्त भागात जात असतात. मुकेश चंद्राकार यांची पुर्नरावृत्ती गडचिरोली जिल्हयात होवू नये. महाराष्ट्र शासन अधिनियम सन २०१८ क्र. १९ दिनांक ८/१०/२०१९ राजपत्रानुसार



जिल्ह्यातील पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे आदि मागण्याकरीता गडचिरोली जिल्हयातील पत्रकारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा काढून जिल्ह्याधिकारी अविशांत पडां व जिल्हा पोलीस अधिक्षक निलोत्पल यांच्या मार्फतीने देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री, राज्यपाल , छत्तीसगडचे मुख्यमंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पाठविण्यात आले.

मोर्च्यात पत्रकार प्रा. मुनिश्वर बोरकर, व्येंकटेश दुडमवार, संजय टिपाले, सुरेश पद्मशाली, मुकुंद जोशी, उदय धक्काते, हेमंत डोर्लीकर, प्रल्हाद म्हशाखेत्री, प्रकाश ताकसांडे, प्रकाश दुबे, जगदिश कन्नाके, मारोती भैसारे, विलास ढोरे, सुरज हजारे, राजरतन मेश्राम, प्रा. दिलीप कहुरके, नाशिर जुम्मनशेख, हेमंत दुनेदार, महेश सचदेव, कैलास शर्मा, दिनेश बनकर, कृष्णा वाघाडे, हस्ते भगत, नशिर शेख, भाविकदास कळमकर, मुकेश हजारे, संदिप कांबळे, विना. द कुळवे, किशोर खेवले, सोमनाथ उईके, निलेश सातपुते, श्रीमंत सुरपाम, शंकर ढोलगे, जयंत निमगडे, हर्ष साखरे, कबिर निकुरे, प्रमोद राऊत, विजय शेडमाके, टावर मडावी, उमेश जलपल्लीवार, पुंडलिक भांडेकर, अनुप मेश्राम, श्रावण वाकोडे, कालिदास बुरांडे, धनराज वासेकर, विलास वाळके, गोर्वधन गोटाफोटे, रवि मंडावार, राजेश खोब्रागडे, चोखोबा ढवळे, सतिस टेंभुर्णे, धम्मपाल दुधे, नाजुक भैसारे, रेखा वंजारी, विजया इंगळे , तिलोतमा हाजरा आदी उपस्थित होते.

## धुक्यांनी रब्बी पिंकांचे नुकसान

**गडचिरोलीः** रब्बी हंगामातील तूर व इतर रब्बी पिकांचे धुके आणि दव पडल्याने मोठे नुकसान होत आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन घटले आहे. त्यामुळे कृषी विभागाने पाहणी करून शासनाने तत्काळ नुकसानभरपाई द्यावी, अषी मागणी शेतकरी करीत आहेत. पिकांचे होणारे नुकसान भरून निघावे म्हणून शेतकरी काढत असलेल्या पीकविम्यामध्ये धुके व दव पडल्याने होणारे नुकसान बसत नसल्याचे पीक विमा कंपनन्यांचे म्हणणे आहे.

**उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्रमांक : ०७१३३/२६६४३३ फॅक्स क्रमांक ०७१३३/२६६४३३ e-mail:dycfalpli@gmail.com

उपवनसंरक्षक आलापल्ली वनविभाग, आलापल्ली, तहसिल अहेरी, जि. गडचिरोली यांचे वतीने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे पंजीकृत यांचेकडून खालील दिलेल्या प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क. | कामाचा तपशिल | नग | कामाची रक्कम (रूपये) | इसारा रक्कम (EMD) | कोऱ्या निविदा नमुण्याची किंमत | टेंडर आयडी | पुरवधारकांचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अनगड दगडी बंधारा बांधकाम खंड क्र. १५३३ ठाकूरनगर घोट परिक्षेत्र | 10 | 299151/- | 3000/- | 590/- | E-TN 62 | खुला प्रवर्ग |
| २ | गॅबीयन बंधारा खंड क्रमांक १५३३ ठाकुरनगर घोट परिक्षेत्र | 4 | 299998/- | 3000/- | 590/- | E-TN 63 | |
| ३ | गॅबीयान बंधारा खंड क्रमांक १५३१ ठाकुरनगर घोट परिक्षेत्र | 4 | 299872/- | 3000/- | 590/- | E-TN 64 | |
| ४ | साठवण बंधारा बांधकाम खंड क्रमांक ५४४ ठाकुरनगर घोट परिक्षेत्र | 1 | 299259/- | 3000/- | 590/- | E-TN 65 | |
| ५ | नाला खोलीकरण खंड क्रमांक १५३१ ठाकुरनगर घोट परिक्षेत्र | 1 | 299934/- | 3000/- | 590/- | E-TN 66 | |
| | **एकूण** | | **1498214/-** | | | | |

विस्तृत माहितीसाठी खालील नमुद संकेतस्थळावर भेट देण्यात यावे.

Portal :- http://mahatenders.gov.in
Sub Portal :- www.mahaforest.nic.in

**जिमाका/गड/ जाहिरात क्रमांक ८२३**

**उपसनसंरक्षक**
**आलापल्ली वनविभाग, आलापल्ली**

## वंजारी समाजाचे गडचिरोलीत निदर्शन



**प्रतिनिधी**

**गडचिरोली दि. ९ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मनोज जरांगे, अंजली दमानिया आणि आ. सुरेश धस हे आक्षेपार्ह वक्तव्य करुन वंजारी समाजाची बदनामी करीत आहेत, असा आरोप करीत आज ९ जानेवारी रोजी वंजारी समाज सेवा परिषदेच्या वतीने गडचिरोली येथे निदर्शने करुन तिघांचा निषेध करण्यात आला.

संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मनोज जरांगे, अंजली दमानिया आणि आ.सुरेश धस हे वंजारी समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करीत असून, चिथावणी देत आहेत. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी वंजारी समाजाची भूमिका आहे. मात्र, मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आकसबुद्धीने आरोप करण्यात येत असून, वंजारी समाजाची बदनामी केली जात आहे. त्यामुळे जरांगे, दमानिया आणि आ.धस यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी वंजारी समा. जबांधवांनी केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या निदर्शनात चंद्रशेखर भडांगे, सुमित्रा धात्रक, दिलीप आखाडे, प्रा. सुनीता साळवे, पौर्णिमा कहुरके, प्रिया आखाडे, प्रशांत आखाडे, कल्पना धाईत, पौर्णिमा करपे, स्नेहल साळवे, अरुणा कहुरके, कल्पना दांडेकर, मंगला धात्रक, कोमल साळवे, सीमा धात्रक, करिश्मा आखाडे, संजय धात्रक, अनिल साळवे, रोहित गेडाम, राजेंद्र साळवे, वीणा हेमके, विजय साळवे, रोशन हेमके, अनुप साळवे, देविदास आखाडे, प्रशांत बांगर, पवन आखाडे, गजानन साळवे, गणेश तारक, विक्रम गोरे, साहिल आखाडे, योगेश आखाडे, आदी उपस्थित होते.

**कार्यालय नगर परिषद, देसाईगंज**
**जि. गडचिरोली**

ई-मेल mcwadsa@gmail.com
दु.क्र. ०७१३७-२७२०२२
जा.क्र.कावि/नपदे/कर.वि/०१/२०२५
दिनांकः ०९/०१/२०२५

**(जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर, बॅनरबाबत जाहीर सूचना)**

नगर परिषद देसाईगंज, हद्दीतील सर्व दुकाने, संस्था, आस्थापना, मार्केट संघटना, कार्यालये, शाळा, राजकीय पक्ष, प्रमुख कार्यकर्ते व तसेच सर्व सुजाण नागरिकांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीएमसी ३०१०/प्र.क्र.३९४ (भाग-२)/नवि-२२ दि. २२/०६/२०२३ नुसार महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत (आकाश-चिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) मार्गदर्शक तत्त्वे, २०२३ प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत तसेच नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. नाप्रसं/का-०६/२०२३/जहिया-१५५/२०११/६३३४ दि. २१/११/२०२३ अन्वये मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.१५५/२०११ या प्रकरणी दि. ३१/०१/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने जाहिराती,घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर, फ्लॅक्स बॅनर इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिरातीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

**१.** नगर परिषद वाडी हद्दीमध्ये होर्डिंग, पोस्टर, फ्लेक्स, बॅनर इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती लावण्याकरिता रितसर https://mahaulb.in/MahaULB/index# या पोर्टलवर अर्ज करून परवानगी घेण्यात यावी.

**२.** नगर परिषद देसाईगंज हद्दीमध्ये होर्डिंग, पोस्टर, फ्लेक्स, बॅनर इ. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती यावर अर्जदाराचे नाव परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड लावणे बंधनकारक आहे.

**३.** अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग पोस्टर, बॅनर संबंधी तक्रार नोंदणीकरिता ०७१३७- २७२०२२ या क्रमांकावर अथवा ८७८८३७४८६८ या क्रमांकावर SMS अथवा व्हॉटसअप द्वारे संपर्क करावा.

**४.** बेकायदेशीर व अनधिकृतपणे बॅनर, जाहिरात घोषणा फलक, पोस्टर लावलेले निदर्शनास आल्यास सर्व संबंधीतावर बोर्ड व इतर साहित्य जमा करून दंड आकारून महाराष्ट्र मालमत्तेच्या विद्रूपनास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. ही विनंती.

स्वा/-
(डॉ.कुलभूषण रामटेके)
मुख्याधिकारी
नगर परिषद देसाईगंज

PNINO-MAHAMAR 2010585
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

